ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

# आदिवासींचे संघर्षमय जीवन

**डॉ. सोमा पी. गोंडाणे**

*राजीव गांधी कला महाविद्यालय, पाटण*

*ता. जीवती, जि. चंद्रपूर*

**गोषवारा**

*भारताच्या सामाजिक व्यवस्थेत आदिवासी किंवा अनुसूचित जमाती समाजाला एक प्रकारची उपेक्षा सहन करावी लागली आहे. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात वसाहतवादाच्या विरोधात आणि आदिवासी समुदायांच्या त्यांच्या अस्मितेचे रक्षण करण्याच्या क्षमतेच्या बळावर दहा मोठे विद्रोह झाले. हा असा एकमेव समुदाय आहे की ज्याने कधीही कोणताही मध्यम मार्ग स्वीकारला नाही किंवा पूर्ण स्वातंत्र्य आणि त्याच्या अस्मितेच्या प्रश्नावर कोणतीही तडजोड केली नाही; आदिवासी हे भारतातील मूळ रहिवासी आहेत आणि आर्य भारतात येण्यापूर्वीपासून ते येथे वास्तव्य करत आहेत. आज आदिवासी किंवा अनुसूचित जमाती समाजासमोर खरोखरच त्यांची सामाजिक-सांस्कृतिक अस्मिता जतन करण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, जो अनेकदा त्यांच्या आर्थिक दारिद्र्यात इतका विरघळला आहे की खरा प्रश्न दडलेला आहे. आदिवासी या भूमीवरचे मूलनिवासी. जल-जंगल-जमिनीवर त्यांचा अधिकार, प्राचीन भाषा, प्राचीन संस्कृती, प्राचीन कला आदिवासींच्या. पण, आज आदिवासींचे अस्तित्वच संपवण्याचे षडयंत्र सर्वच बाजूंनी रचले जाताना दिसते आहे. क्रांतिसूर्य बिरसा मुंडाच्या 'ऊलगुलान' (सर्व क्षेत्रांत एकाच वेळी क्रांती) या मंत्राने आदिवासी जागृत झालाय, एकसंध झालाय. निसर्गाच्या सानिध्यात राहणारा आदिवासी समाज हा इंग्रज, सावकार, जंगलाचे अधिकारी यांच्याकडून होणाऱ्या आर्थिक शोषणामुळे अगदी दुर्बल बनला होता. स्वतःच्या पिळवणूकीची व हक्काची जाणीव झाल्यानंतर त्याच्याविरुद्ध बंड पुकारले. स्वतःच्या स्वार्थापोटी आधुनिक समाज आदिवासींवर निर्घुण आक्रमण करीत आहे. जंगलाची लाकूडतोड करताना त्यांच्या संस्कृतीवर गाढवाचा नांगर फिरवला जात आहे. आदिवासींमध्ये असलेला एकोपा झपाट्याने नष्ट होत आहे. त्यांच्या संस्कृतीचा ऱ्हास होताना दिसतो विकासाच्या नावाखाली आदिवासींचे मोठ्या प्रमाणात धर्मांतर होताना आढळून येत आहे. आदिवासींची मुले शिक्षण घेतात ते शिक्षण त्यांच्या भाषेतून दिले जात नाही त्यामुळे त्यांची मूळची भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. भविष्यात त्यांची संस्कृती पूर्णपणे नष्ट होणार काय असा प्रश्न निर्माण होतो.*

***मुख्यशब्द***

*आदिवासी, जंगल, जमीन, संस्कृती, भाषा, शिक्षण*

**प्रस्तावना**

भारतावर ज्या-ज्या वेळी परकीय आक्रमणे झाली, त्या-त्या वेळी येथील आदिवासी जमातींनी त्यांना अत्यंत खंबीरपणे विरोध केला. ब्रिटिशांविरुद्ध लढताना आदिवासींनी शंभरपेक्षाही अधिक लहान-मोठे सशस्त्र संघर्ष केले. या संघर्षामध्ये अनेक आदिवासी वीर हुतात्मा झाले. इ.स. १७८५ ला बिहारमध्ये तिलका मांझी हा ब्रिटिशांविरुद्ध संघर्ष करून फासावर गेला. तेव्हापासून आदिवासींच्या लढ्याचा धगधगता इतिहास सुरू आहे. भारतात स्वकियांच्या आणि परकियांच्या राजवटी आल्या, यवनांची साम्राज्ये आली आणि गेली मात्र, त्यांनी आदिवासी जमातींचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले. ब्रिटिश राजवटीत मात्र आदिवासी संस्थाने खालसा करायला सुरुवात झाली. जंगलखाते निर्माण करून तेथे स्वतःचा सर्वतोपरी अधिकार सुरू केला. त्याचा परिणाम आदिवासींच्या पारंपरिक जीवनावर झाला आणि त्याचा परिणाम म्हणून १४५० पासून तर स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत निरनिराळ्या प्रदेशातील आदिवासी वीरांनी स्वातंत्र्यासाठी उठाव केले, चळवळी केल्या, ब्रिटिशांशी संघर्ष केले, पण त्याची दखल इतिहासात नाही. 21वे शतक हे ज्ञानाचे शतक आहे. ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान ज्यांच्या हाती असेल तोच संपूर्ण देशावर सत्ता गाजवू शकणार. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन आदिवासींना विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. आदिवासी समाज हा अतिप्राचीन मूळचा भारतीय समाज आहे. हा समाज पूर्णपणे निसर्गपूजक होता, त्यांचे देव,भाषा चालीरीती अन्य ग्रामीण व शहरी लोकांपेक्षा भिन्न आहे.भारतीय राज्यघटनेने त्यांच्या संस्कृतीचा सन्मान करून आदिवासींना आधुनिक विकासाच्या संधी उपलब्ध करून दिली आहे. चंद्रपूर, नागपूर,गडचिरोली यासारख्या जिल्ह्यात गोंड राज्याचे वास्तव्य होते. ब्रिटिश राजवटीनंतर आदिवासींना अनेक समस्यांचा सामना करावा लागला. त्यांना स्वातंत्र्योत्तर काळात मूळ प्रवाहात आणण्यात आले. हे जरी खरे असले तरी ते आपल्या मूळच्या संस्कृतीपासून दूर जात आहे हे मात्र विसरता येणार नाही. कारण त्यांच्या नवीन पिढीला त्यांच्या मूळच्या संस्कृतीचा विसर पडला आहे.आदिवासी समाज घनदाट अरण्यात वास्तव्य करणारा समूह आहे. बऱ्याच आदिवासींचा ब्रिटिश काळात प्रगत समाजाशी अनेक कारणाने संबंध आले.आदिवासी जमातीच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने पाऊल उचलण्यात आले. यातून आदिवासी समाजामध्ये

व्यापक प्रमाणात संरचनात्मक व प्रकार्यात्मक परिवर्तन घडून आले. अनेक आदिवासी जमाती ग्रामीण व शहरी समूह समुदायाशी एकरूप झाल्या. परंतु त्यांना त्यांच्या मूळच्या संस्कृतीचा विसर पडत आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील पहाडावर राहणाऱ्या आदिवासींनी प्रगत समाजाची संस्कृती अंगिकारली आणि त्यांच्या जीवनशैलीत परिवर्तन झाले. स्वतःच्या संस्कृतीविषयी पाहिजे तेवढी निष्ठा त्यांच्यात राहिलेली नाही आदिवासींचा खरा लढा होता. तो म्हणजे जंगल जमिनीचा कारण आदिवासी ज्या जंगली भागात वास्तव्य करायचे त्या जमिनीवर त्यांची गाढ निष्ठा होती. त्यांचा संपूर्ण उदार निर्वाह जंगली वस्तू आणि शेतजमिनीवरच होत होता. त्यामुळे धरतीला माता म्हणून संबोधले जात होते. परंतु ब्रिटिशांनी आदिवासी भागांवर कब्जा केल्याने त्यांना जीवन जगण्याची गंभीर समस्या निर्माण झाली. त्यामुळे त्यांनी आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी ब्रिटीशांशी लढा पुकारला आणि त्यात अनेक आदिवासी मरण पावले.परंतु आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी इंग्रजा सोबत तन-मन-धनाने लढा दिला त्याचा इतिहास साक्ष आहे.

आदिवासी या नावावरूनच भारतात हा समाज फार पुरातन काळापासून राहणारा समाज आहे हेच स्पष्ट होते. तरीही निरनिराळ्या टोळ्यांच्या आणि विशेषतः आर्यांच्या आगमनानंतर त्यांची वस्ती हरलेली आहे असे इतिहास सांगतो. जंगलद-यात राहिलेल्या या समाजाने इतर समाजाच्या वाहत्या प्रवाहांपासून स्वतःला सतत दूरच ठेवले. आपल्या जीवनात तो मशगुल राहिला. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचू शकले नसले तरी अलीकडील काळात त्यांचा थोडाफार विकास होताना दिसून येत आहे. परंतु त्यांच्यातले अठराविसावे दारिद्र्य अजूनही संपलेले नाही. ज्या जमिनीवर ते वर्षानुवर्ष राहत होते आणि जी जमीन कसत होते, तीच त्यांची जमीन त्या भागात नंतर शिरकाव केलेल्या सुशिक्षित व सधन व्यक्तीने पैसा आणि प्रतिष्ठा याच्या जोरावर बळकावली आणि आदिवासींना त्यांचे दस्यू बनवले. ते ज्या शेताचे मालक होते. आता ते त्या शेताचे नोकर म्हणून काम करताना आढळून येतात. या देशाचे मूळचे रहिवासी असणाऱ्या आदिवासींना धरतीचे पापी प्राणी, नरभक्षक,काळे, रानटी असा नावांनी वेदपुराण काळापासून अवहेलना केली. आणि आजही ती अवहेलना थांबलेली नाही.आता साऱ्या आदिवासींना वनवासींना करून त्यांना धर्म गुलामगिरीच्या वनवासात लोटण्याचे वाईट कृत्य करताना धर्माचे ठेकेदार दिसून येतात. धर्मांतरनाच्या आणि ख्रिस्तीकरण्याच्या नावाखाली आदिवासींमध्ये धार्मिक असंतोष पसरविला जात आहे. जबरदस्तीने त्यांचे धर्मांतरण घडवून आणल्या जाते. पण आदिवासींनी आपल्या मूळच्या धर्माचा पाहिजे तो त्याग केलेला दिसत नाही. त्यांच्या मनात गोंधळ निर्माण झाला. काय स्वीकारावे आणि काय स्वीकारू नये,अशा अवस्थेत हे आदिवासी आपल्या परंपरागत संस्कृतीला हळूहळू पारखे होत आहे. त्यांच्या संस्कृतीचा ऱ्हास होताना आढळून येतो. आदिवासींच्या विकासासाठी शासनाने अनेक योजना राबविल्या परंतु त्यांना फारसे यश मिळाले नाही. मध्यंतरीच्या काळात शासनाने आदिवासी साठी नवसंजीवनी नावाची योजना आणली. आदिवासींचे कुपोषण, रोगराई व मरण- तारणावर जणू काही ती यक्षिणीची कांडी आहे. या भावनेने त्यांचे स्वागत झाले. परंतु आज ही योजना आदिवासींसाठी यक्षिणीची कांडी न करता सरकारी यंत्रणेला डोल मात्र ठरली आहे. अनेक खात्यांनी बरीच वर्ष खात बसावे एवढे आर्थिक खाद्य नवसंजीवनी योजनेने त्यांना दिले. पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यात जेवढी आदिवासींची बालके कुपोषणाने आहे मेळघाटात बालकांच्या मृत्यूचे प्रमाण सर्वात जास्त आहे मग उपाययोजना सुरू होते परंतु या प्रश्नांचा मूलगामी विचार होताना दिसत नाही कुपोषणाची समस्या नाही असा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम शासन यंत्रणा मोठ्या हुशारीने आणि चातुर्याने करते त्यामुळे हा प्रश्न महाराष्ट्रात पूर्णपणे सुटला जात आहे असा दावा केला जातो वास्तविक स्थिती अशी आहे की आदिवासींच्या कुपोषणाचा प्रश्न सुटलेला लाच नाही फक्त कागदोपत्री कसे दाखविले जाते आदिवासींची ही समस्या सुटली नाही तर भविष्यात त्यांच्या जमाती नष्ट होऊ शकणार यात मात्र शंका नाही.

आदिवासी संबंधी प्रगत समाजात अनेक गैरसमज आहे. हा समाज अप्रगत, रानटी आहे. असे अनेक प्रकारचे गैरसमज दिसून येते. परंतु या समाजाला जाणून घेण्याचा प्रयत्न कोणीही केलेला नाही. त्यांना वेश्याव्यवसाय करण्यालाही प्रवृत्त केले जाते. त्यामुळे निसर्गपुत्री मध्ये गुप्त रोगाची लागण मोठ्या प्रमाणात झाली. त्यांची वेठ- बिगारी अजूनही सुटलेली नाही. प्रगत समाजाचे आक्रमण कोणत्या ना कोणत्या कारणाने होतच राहते.पण कित्येक हजार वर्षांची आदिम संस्कृती नष्ट होत आहे. कधी अंमली झुडपांची लागवड करण्यासाठी आदिवासींना त्यांच्या मूळच्या जागेवरून हुसकावून लावल्या जाते. तर कधी कारखाना काढण्याच्या नावावरून आदिवासींना निराश्रित केले जात आहे. विकासाच्या नावाखाली आदिवासींच्या जमिनी हिसकावून घेतल्या जाते. त्यामुळे त्यांचा जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झाला. विकास प्रक्रिया सुरू करताना समाज उध्वस्त होण्याच्या प्रक्रियेस सुरुवात होत असेल तर ही विकास प्रक्रिया फसवी आहे. आदिवासींचा सखा सोबती आहे. जंगल हेच त्यांचे घर व जंगल हेच त्यांचे उपजीविकेचे साधन आहे. कंदमुळं, फळं, मुळे, मद्य यासारख्या वस्तूंचे हे लोक संकलन करायचे.

निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या आदिवासींचा जीवनविषयक दृष्टिकोन, धर्म विषयक संकल्पना, जादूटोणा, मंत्र-तंत्र आदी जंगलाने घडविलेला आहे. निसर्ग व आदिवासी यांच्यामधील जिव्हाळ्याचे नाते जंगलाने निर्माण केले आहे. जंगला संबंधी कोणतीच बंधने नसल्याने आदिवासी जंगलाचे राजे होते. पण जंगल विषयक कायद्याने आदिवासी नाळ जंगलापासून तोडण्या सारखीच झाली आहे. त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य हिरावून घेण्यामध्ये जंगलाचे कायदे व जंगलाचे सरकारी अधिकारी जबाबदार आहे. त्यामुळे आदिवासींच्या मनात असंतोष निर्माण झाला. कंत्राटदार, महसूल व जंगलाचे अधिकारी यांच्या दडपशाही धोरणाने आदिवासींच्या मनात वैफल्याची भावना निर्माण झाली. आदिवासींवर अमर्यादित अधिकार लादले जातात. जंगल अधिकाऱ्यांना कायद्याने सर्व प्रकारचे संरक्षण दिले आहे. सरकारच्या अनुमतीशिवाय जंगल अधिकाऱ्यांना कोर्टातही खेळता येत नाही. तेव्हा एक वेळच्या या जंगलाच्या राजांना सरकारी अधिकाऱ्यांच्या समोर झुकावे लागते. यातून स्वाभाविकपणे निर्माण झालेल्या विव्देषातून जंगल अधिकारी व आदिवासी यांच्यात सतत चकमकी उडत असतात. जंगल जमिनीवर आक्रमण, जंगल निर्मित वस्तूंची चोरी यासारखे आरोप त्यांच्यावर करून आदिवासींना गुन्हेगार मानण्यात येते. आदिवासींवर अन्याय करणारा व त्यांची अक्षरशः पिळवणूक करणारा जंगलाचे ठेकेदारही आहे. तो स्वतःकरिता असलेल्या प्रचंड जंगल तोडीसाठी धूर्तपणे आदिवासींचा बळी घेत असतो. त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना पद्धतशीररीत्या लुबाडले जाते. इतकेच नव्हे तर लबाडी करणाऱ्या या लोकांना सरकारी अधिकाऱ्यांचा आशीर्वाद लाभलेला असतो. त्यामुळे आदिवासींच्या खाजगी जीवनावर ही त्यांची पापी नजर असते. आदिवासी निष्पाप स्त्रियांची अब्रू लुटली जाते.

प्रगत समाजाच्या संपर्काने काही अनिष्ट प्रथा त्यांच्या जीवनात शिरलेल्या आहेत. त्यांच्या अध:पतणाची ती सुरुवात आहे. बालविवाह प्रथा, वधू मुल्य घेण्याची प्रथा, स्त्री-पुरुषांच्या संबंधाविषयी संकुचित वृत्ती त्यांच्या समाजात येऊ लागल्या आहेत. सगळ्यात चिंतनीय बाब म्हणजे त्यांची संस्कृती जिवंत ठेवण्याचे महत्वाचे कार्य करणारी युवागृहे नष्ट झाली आहे. आर्थिक कार्याची ओळख करून देतानाच त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण केली जात असे. पण प्रगत समाजाच्या संपर्काने आदिवासींना आपल्या मुलांना युवागृहात पाठवणे कमीपणाचे वाटते. आणि त्या ठिकाणी त्यांच्या मुली सुरक्षित नाही. कारण त्यांच्या युवागृहाचा फायदा जंगली ठेकेदार, जंगलाचे अधिकारी घेत असतात. त्यामुळे आदिवासी युवागृहाचा ऱ्हास झाला आहे. आदिवासींचे प्रश्न डोंगरा एवढे मोठी आहे. पण ते सोडविण्यासाठी कोणीही मनःपूर्वक प्रयत्न केले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आदिवासींना जाणीवपूर्वक दूर ठेवले, ख्रिश्चन मिशनरी, प्रशासक, जमीनदार व सावकार यांनाच केवळ आदिवासी संपर्क साधणे सहमत होते. इतरांनी आदिवाशीसोबत कोणताही संबंध ठेवू नये. त्यामुळे देशातील राष्ट्रीय चळवळीने ही आदिवासींना लक्षात घेतले नव्हते. खरे म्हणजे इंग्रजाविरोधी आदिवासींनी शस्त्र सर्वप्रथम उचलले होते. स्वातंत्र्याच्या चळवळीत आदिवासीने फार मोठा त्याग केला होता त्याची नोंद इतिहासाने घेतली नाही. संताल व मुंडा आदिवासी नी १८५५ ते ५६ साली ब्रिटीश वसाहतवादा विरोधी रक्त सांडवले होते. संथाल व मुडाचे बंड मोडून टाकण्यासाठी ब्रिटिशांना खूप प्रयत्न करावे लागले. यामध्ये हजारो संथाली लोक मरण पावले. ब्रिटिशा विरोधी दंड ठोकणे हे सामान्य काम नव्हते. त्यामध्ये आदिवासींची मनुष्य शक्तीची हानी झाली. यावरून हे लक्षात येते की आदिवासींचा शोषण करण्याचा अंत संपला होता म्हणून हे आदिवासी इंग्रजांविरोधात आपल्या अस्तित्वाचा लढा लढत होते. ईस्ट इंडिया कंपनीने जमीनदारी पद्धती सुरू केली. हे जमीनदार आदिवासीकडून जास्त खंडणी वसूल करीत होते. त्यामुळे आदिवासी कर्जबाजारी झाला. त्यांच्या जमिनी सावकारांनी हिसकावून घेतल्या. त्यामुळे हे आदिवासी हतबल झाले. त्यांच्या मनात असंतोष निर्माण झाला १८५५ रोजी सरकारी नोकर, जमीनदार, सावकार व ब्रिटिश सरकार यांच्या विरोधी आदिवासीने लढा उभा केला.आदिवार्शींनी केलेलं हे बंड एवढे प्रचंड होते की ब्रिटिश सरकार काही काळ तरी हादरून गेले होते.या बंडाची नोंद काल मार्क्सने घेतली होती.परंतु इंग्रजांच्या सामोरे आदिवासी टिकले नाही. या संथाल जमातीने होत असलेल्या अन्यायाविरुद्ध बंड पुकारले ही गोष्ट फार महत्वाची आहे.

स्वातंत्र्यानंतर भारतीय जनतेने लोकशाही शासन पद्धती स्वीकारली देशामध्ये प्रजासत्ताक स्थापनेनंतर उत्तुंग व्यक्तिमत्व असलेले थोर नेते नेतृत्व करू लागले स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आदिवासी विकासाची बरीच कामे हाती घेण्यात आली आदिवासीना दारातून बाहेर काढण्यासाठी मोफत शिक्षण प्रक्रिया सुरू झाली आदिवासी विभागात आश्रम शाळा काढण्यात आल्या आदिवासींची मुले शिक्षणासाठी शाळेत जाऊ लागली त्यातून अनेक परिवर्तन घडून आले बऱ्याच आदिवासींचे जगणे जंगलावर अवलंबून आहे त्यासाठी शासनाने वनग्राम ची योजना राबविली आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासींसाठी विविध योजना राबविल्या जातात शैक्षणिक व तांत्रिक विकास रोजगाराच्या संधी वेगवेगळ्या क्षेत्रात संधी उपलब्ध करून दिल्या जात आहे. त्यांच्या पेहरावर आणि मनात बदल करून

आणण्याचा प्रयत्न केला जातो आदिवासी संस्कृती टिकून ठेवणे व प्रगत समाजासी स्पर्धा करून आधुनिक डिजिटल युगात आपला ठसा उमटवण्याची त्यांना गरज भासत आहे. नवतरुण आणि आपल्या संस्कृतीचा विसर पडू नये यासाठी कोणत्याही प्रकारचा कमीपणा न बाळगता आधुनिक समाजाच्या स्पर्धेत उतरून आपली संस्कृती जिवंत ठेवणे आवश्यक आहे.

**संशोधनाची आवश्यकता**

आदिवासी लोकांना जंगलाचा राजा असे संबोधले जात होते. स्वतःच्या हक्कासाठी व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या बचावासाठी आदिवासीने केलेले योगदान समजून घेणे. तत्कालिन आदिवासींच्या परिस्थितीचा आढावा घेणे. आदिवासींना त्यांच्या हक्काची जाणीव व्हावी व त्यांच्यात सकारात्मक जाणीव निर्माण करणे हा उद्देश ठेवून प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केली आहे

**संशोधनाचा उद्देश**

१. आदिवासीच्या बलिदानाचा आढावा घेणे
२. आदिवासीच्या संस्कृती परीवर्तना संबंधी जाणून घेणे
३. आदिवासींनी आपल्या अस्तित्वासाठी लढा दिला ते जाणून घेणे
४. आदिवासींचे होणारे शोषण याविषयीचा आढावा घेणे

**अध्ययन पद्धती**

प्रस्तुत स्त्रोत शोध निबंधासाठी स्त्रोतांचा अवलंब केला आहे यासाठी विषयाची संबंधित माहिती उपलब्ध करण्यासाठी विविध ग्रंथसंपदा पुस्तके मासिके वृत्तपत्रातील लेख इंटरनेटचा आधार घेतलेला आहे

**निष्कर्ष**

सर्वात प्रथम आदिवासींनी इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढा पुकारला होता आदिवासींची नैसर्गिक साधन संपत्ती वर फार मोठी निष्ठा होती जंगल जमीन हेच त्यांच्या उपजीविकेचे साधन असल्याने ब्रिटिशांनी त्यांचे जंगली अधिकारावर बंदी घातली आणि आदिवासींचा जीवन-मरणाचा प्रश्न निर्माण झाला आपले अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी आदिवासींनी तन-मन-धनाने लढा दिला त्यात त्यांना अपयश जरी आले असले तरी त्यांचा लढा हा फार महत्त्वाचा होता.

**संदर्भ ग्रंथ**

१. *नंदकिशोर नैताम, गोंडी संस्कृतीची वास्तविकता, गोंडवाना गोटूल साहित्य निर्मिती व प्रकाशन संस्था मेंढा-लेखा, जिल्हा गडचिरोली*
२. *गुरुनाथ नाडगोंडे, भारतीय आदिवासी, कॉंटिनेंटल प्रकाशन, विजय नगर-पुणे*
३. *डॉ. गोविंद गारे, आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, सुगावा प्रकाशन, पुणे 30*
४. *गुरुनाथ नाडगोंडे, सामाजिक आंदोलने, कॉंटिनेंटल प्रकाशन, विजय नगर -पुणे 30*
५. *नंदकिशोर नैताम, गोंडी संस्कृतीची वास्तविकता, गोंडवाना गोटूल साहित्य निर्मिती व प्रकाशन संस्था मेंढा-लेखा, जिल्हा गडचिरोली*